विषय :- " No Tolerance for Traffic Violation. " ( **विशेष मोहिमे बाबत.**)

---

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता व वाहतूक सुरळीत व सुरक्षित चालणेकरीता वाहतूक शाखेकडून वारवांर वेगवेगळया रस्त्यावर विशेष मोहिमांचे आयोजन केले जाते. सदर मोहीमे अंतर्गत राबविण्यात येणा-या एका रस्त्यावर कोणत्याही वाहतूक नियमांचे उल्लंघन होणार नाही याची खात्री केली जाणार आहे व त्या रस्त्यावर येणा-या सर्व वाहनचालकांची कसुन तपासणी होणार आहे. सदरची तपासणी शहरातील मुख्य रस्त्यावर वेगवेगळ्या दिवशी टप्या-टप्याने अचानकपणे स्पेशल फोर्स/अतिरिक्त मनुष्यबळ देवून No Tolerance हि विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे, त्यामध्ये झेब्रा क्रॉसींगवर उभे राहणारे, विना हेल्मेट वाहन चालविणारे, ट्रिपल सिट वाहन चालविणारे, गाडीचे मुळ कागदपत्रे जवळ न बाळगणारे, रॉंग साईडने येणारे वाहनचालक, सिटबेल्ट न लावणारे, वाहनचालविताना मोबाईल वरती बोलणारे, लायसन्स नसताना वाहनचालविणारे व इतर वाहतूकीचे नियमांचे उल्लंघन करणारे सर्व वाहनचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे.